लोकमत




निर्मला इन्स्टिट्यूटच्या आंतर महाविद्यालयीन टेबल टेनिस स्पर्धेत महिला गटात विजेतेपद पटकावलेल्या साखळी सरकारी महाविद्यालयाच्या संघाबरोबर मारिया फर्नांडिस, डेलिया आंताव, क्लिफ्टन फर्नांडिस व अशोक शिरोडकर.

# टेबल टेनिस स्पर्धेत साखळी, पर्वरीचे संघ विजयी

लोकमत न्यूज नेटवर्क

मडगाव : पणजीतील निर्मला इन्स्टिट्यूट या संस्थेच्या शारीरिक शिक्षण विभागाने आयोजित केलेल्या पहिल्या निमंत्रितांच्या आंतर महाविद्यालयीन टेबल टेनिस स्पर्धेचे अजिक्यपद पुरुष गटात पर्वरीच्या विद्या प्रबोधिनी महाविद्यालयाने, तर महिला गटात साखळीच्या सरकारी महाविद्यालयाने पटकावले.

राज्यातील एकूण १३ महाविद्यालयांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. पुरुष गटात उपविजेतेपद गणपत पार्सेकर महाविद्यालय-हरमल, तर महिला गटात विद्या प्रबोधिनी-पर्वरी या महाविद्यालयाला प्राप्त झाले. बक्षीस वितरण सोहळ्याला निर्मला सोसायटीच्या उपाध्यक्ष मारिया फर्नांडिस, प्रभारी प्राचार्य डॉ. डेलिया आंताव, विद्या प्रबोधिनीचे क्रीडा संचालक सनी काणेकर, निर्मला इन्स्टिट्यूचे क्रीडा संचालक क्लिफ्टन फर्नांडिस तसेच साखळी सरकारी महाविद्यालयाचे क्रीडा संचालक अशोक शिरोडकर उपस्थित होते.



3:50 pm